# मे. जे.एस.डब्ल्यु.एनर्जी पी.एस.पी.टू.लि.,काळभोंडे गाव, तहसिल शहापूर, जि. ठाणे या कंपनीचे प्रस्तावित भावली पंप स्टोरेज प्रकल्पाविषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त

केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल विभाग, भारत सरकार यांचे पर्यावरण आघात मूल्यांकन (इ.आय.ए.) अधिसूचना २००६, दि. १४/०९/२००६ च्या तरतुदीनुसार मे.जे.एस.डब्ल्यु.एनर्जी पी.एस.पी.टु. लि., कळभोंडे गाव, तहसिल शहापूर, जि. ठाणे, महाराष्ट्र यांचे प्रस्तावित "भावली पंप स्टोरेज प्रकल्पाबाबत" पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ येथे दि. २०.११.२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने सदर उद्योगाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याकरिता मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) यांचेकडे उप प्रादेशिक कार्यालय म.प्र.नि. मंडळ कल्याण-३ यांजकडून प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) मप्रनि, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई-१११/२०२४, पत्र क्र.BO/JD(WPC)/PH/B-240119-FTS-0170, दि. १९.०१.२०२४ अन्वये उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण-३ या कार्यालयास पर्यावरण विषयक जाहीर जनसुनवणी घेण्याचे निर्देश देण्यात आले. सदर प्रकल्पाचे प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांच्या पॅनेलची नियुक्ती करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १) | **जिल्हा न्याय दंडाधिकारी, ठाणे**<br>किंवा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दर्जाच्या कमी नाही असे त्यांचा प्रतिनिधी | **अध्यक्ष** |
| २) | **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी**<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण | **सदस्य** |
| ३) | **उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३** | **संयोजक** |

सदर निर्देशानुसार जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या मान्यतेने त्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३.०२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. कळभोंडे गाव, तहसिल शहापूर, जि. ठाणे येथे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीची जाहीर सूचना सुनावणीच्या एक महिना आधी दिनांक १२.०१.२०२४ रोजी मराठी दै. सकाळ व इंग्रजी दैनिक द फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती. पर्यावरण आघात मुल्यांकनाचा अहवाल व कार्यकारी सारांश यांच्या प्रती मराठी व इंग्रजी भाषेमध्ये खालील ठिकाणी सर्वांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आले होते.

१. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा माळा, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, दक्षिण मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला, शिव (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.
४. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे जिल्हा.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
६. उप विभागीय अधिकारी, ता. शहापूर, जि. ठाणे.
७. प्रादेशिक अधिकारी कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण.
८. तहसिलदार, शहापूर तहसिल कार्यालय, जि. ठाणे.

कृ.मा.प.

९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर, ता. शहापूर, जि. ठाणे.
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, ठाणे, जि. ठाणे.
११. ग्रामपंचायत कार्यालये-कळभोंडे, कोथळे, जांभुळवड, चोंदे खुर्द.,चिलहर, रनविहीर, तलवाडा, साकडबाव, वेलुक, कसारा खुर्द, फुगले, वशाळा बुद्रुक, धाकणे, मोखवणे, ता.शहापूर, जि.ठाणे.

तसेच वर्तमानपत्रातील जाहीर सूचनेद्वारे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा मूळ उद्देश, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस सदर प्रकल्पाविषयी माहिती, प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा यांची माहिती सामान्य जनतेस देणे, त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबबत परिसरातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ यांनी प्रकल्पाबाबत आक्षेप, सूचना, लेखी अथवा तोंडी स्वरुपात अथवा ई-मेलद्वारे कळवाव्यात असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकल्पाबाबत उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण-३ येथे २ सूचना ई-मेलद्वारे प्राप्त झाल्या होत्या. (प्रत सोबत)

मे.जे.एस.डब्ल्यु.एनर्जी पी.एस.पी.टु. लि., या उद्योगाचे पर्यावरण विषयक जनसुनावणी मा.अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या उपस्थितीत दि. १३.०२.२०२४ रोजी सकाळी ११.२४ मि. सुरु करण्यात आली. सदर सुनावणीस लोकप्रतिनिधी, उद्योगाचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, वृत्तपत्र/ वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व परिसरातील सामान्य नागरीक असे एकूण २४५ प्रतिनिधी उपस्थित होते, याबाबतची यादी सोबत जोडलेली आहे. तसेच या जनसुनावणीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्रीमती मनिषा जायभाये-धुळे, अध्यक्षा तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा
२. डॉ. राजेंद्र आ. राजपूत, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण
३. डॉ.सीमा उदय दळवी, संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३
४. श्री. जयप्रकाश भुसारा, क्षेत्र अधिकारी, उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३

संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी मा.अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या परवानगीने जनसुनावणीबाबत प्रस्तावना सादर केली आणि प्रकल्प प्रवर्तकास प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक तांत्रिक बाबींसंदर्भात पॉवरपॉईंटचे सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक यांनी मे.जे.एस.डब्ल्यु.एनर्जी पी.एस.पी.टु. लि., यांचे प्रस्तावित प्रकल्पाचे पॉवरपॉईंट (पी.पी.टी.) सादरीकरणासह तपशिलवार माहिती सर्वांच्या निदर्शनास आणून दिली. प्रकल्पाच्या सादरीकरणा नंतर उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्पाबाबत कोणाला काही सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करावयाचे असतील तर त्यांनी मांडण्यासाठी आयोजकातर्फे आवाहन करण्यात आले तसेच जनसुनावणी दरम्यान लेखी सूचना दयावयाच्या असतील तर म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे दाखल करण्यास सांगितले.

त्यानुसार खालीलप्रमाणे उपस्थितांकडून सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करण्यात आले व त्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकाने सविस्तर अभिप्राय दिले :-

१) **<u>श्री.गुलाब देवराम वीर, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत कोथळे, ता.शहापूर, जि. ठाणे</u>**- ग्रुप ग्रामपंचायत कोथळे मार्फत पत्र दिलेले असून सदर पत्रातील नमूद सोयीसुविधा उपलब्ध करुन द्यावेत ही विनंती.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक यांनी सदर पत्राची नोंद घेण्यात आली आहे असे सांगितले.

कृ.मा.प.

२) **श्री. भालचंद्र जयतु खडके, पोलीस पाटील, कळभोंडे गाव, ता. शहापूर, जि. ठाणे**- या प्रकल्पामुळे रोजगाराबाबत व येण्या-जाण्याचा रस्ता साधारण चिंध्याची वाडी ते लाद्याची वाडी पर्यंतचा रस्ता ब्रिटीश काळापासून सन २०२० च्या वार्षिक निधीतून झालेला आहे. त्यामुळे रस्त्यावर येणाऱ्या तणावामुळे रस्त्याची दुरावस्था होता कामा नये. त्याचबरोबर कंपनी ज्यावेळेस काम सुरु करेल त्यावेळी अवजड वाहने आल्यामुळे विशेषत: रस्त्यालगत लोकांची घरे असल्याने धुळीच्या सम्राज्याने माणसांना, पशु पक्षीअंतर्गत गायी, बकरे यांच्यावर विपरीत परिणाम होऊ नये याची काळजी घ्यावी. तसेच कंपनीच्या टनेलचे काम करतांना होणाऱ्या ब्लास्टींगच्या लहरींमुळे लोकांच्या घरांना दिवसा व रात्री अनावधानाने तडे जाण्याची शक्यता आहे आणि डोंगराळ भाग आयताकार असल्यामुळे वादळी वाऱ्यामुळे भवंडर निर्माण होऊन घरांवर विपरीत परिणाम होतो, या गोष्टींचा विचार करुन घरांना तडे जाऊ नये याची काळजी घ्यावी. तसेच खालच्या जलाशयाचे कळभोंडे ग्रामपंचायत व कळभोंडे वन क्षेत्रातील ८१ टक्के जमीन जाते व तेथे मोठया प्रमाणावर वृक्षतोड होणार असल्यामुळे रस्त्यालगत, टेकडयांवर, वन विभागाच्या जागेवर एका वर्षाला कमीत कमी ५० हजार वृक्षांची लागवड व देखभाल कंपनीमार्फत करण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी या सूचनांचा विचार करण्यात येईल असे सांगितले. तसेच रस्त्याचे रुंदीकरण होणार आहे, यासाठी कोथळे गावाच्या बाहेरुन रस्ता तयार करण्यात येणार आहे, प्रकल्पाच्या ब्लॅस्टींगची क्षमता विहित मर्यादेपेक्षा फार कमी असल्यामुळे कोणाही ग्रामस्थांच्या घरांना तडे जाणार नाहीत आणि जर तडे गेले तर त्याबाबत कंपनीकडून लगेच सर्वेक्षण करुन नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न करण्यात येईल व प्रकल्पाचा टनेल भुमिगत असल्यामुळे त्याचा कोणताही त्रास कोणालाही होणार नाही.

३) **श्री. जनार्दन शि. वीर, सदस्य, ग्रामपंचायत कोथळे, ता. शहापूर, जि. ठाणे**- श्री. खडके, पोलीस पाटील यांनी मुद्दे मांडल्याप्रमाणे चिंध्याची वाडी ते लाद्याची वाडीपर्यंतच्या रस्त्याचा जो प्रश्न आहे त्या रस्त्याचे नियोजन करण्यात यावे. कोथळा, कळभोंडे हे आदिवासी गाव असून या दोन्ही गावातील लोकांच्या उपजिविकेचे साधन जंगलावर आधारित असल्याने कंपनीमार्फत होणाऱ्या वृक्षतोडी पेक्षा जास्त ग्रामस्थांना उत्पन्न मिळेल अशा झाडांची लागवड प्रकल्पाच्या माध्यमातून करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच कंपनीसाठी घेण्यात येणारी खाजगी/वन जमिन कोथळे ग्रामपंचायत हद्दीतील १०६ हेक्टर, काळभोंडे हद्दीतील ८२ हेक्टर व जांभूळवाडी हद्दीतील ६२ हेक्टर संपादित होणार असल्यामुळे या प्रकल्पाला कोथळा-कळभोंडे असे नाव देण्यात यावे. या दोन्ही गावात पाणी टंचाई असून पाण्याचे मर्यादित टँकर सुरु असल्याने पाण्याचा प्रश्न शासनामार्फत मार्गी लावण्यात यावा. तसेच प्रकल्पासाठी ज्यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांना प्रकल्पग्रस्त दाखला देऊन त्यांच्या कुटुंबातील लोकांना प्राधान्याने कायमस्वरुपी नोकरी द्यावी. तसेच परिसराच्या गावातील लोक अशिक्षित असून कंपनीमार्फत शिक्षणाचा, प्राथमिक आरोग्य सेवेसह मोठया आजारांवरही उपचार उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक संस्थांना सी.एस.आर. निधी देण्यात यावा. आदिवासी मंडळाच्या गावदेव मंदिरांची कामेही करुन देण्यात यावीत. शेवटी प्रकल्पामुळे प्रदूषणाचा त्रास होणार असल्यामुळे फिरते वैद्यकीय पथक कायमस्वरुपी ठेवण्यात यावे असे म्हटले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक यांनी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने मुख्यत्वेकरुन पर्यावरणविषयक मुद्दे मांडण्यात यावेत अशी सर्वांना विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, काही ग्रामस्थांची गावदेव व कुलदैवतांच्या मंदिराचे काम करुन देण्याची भावना असून याबाबतचा प्रस्ताव कंपनी व्यवस्थापनाकडे सादर करुन मंदिरांच्या कामाचाही विचार करण्यात येईल. तसेच पाणी टंचाईबाबत माहिती झाल्यावर कळभोंडे गावात कंपनीमार्फत मागच्या वर्षी पाण्याच्या टाकीची व्यवस्था करण्यात आली, सोलार पॅनल लावून पाण्याच्या पंपींगची व्यवस्था उपलब्ध करुन दिली आहे असेही सांगितले.

कृ.मा.प.

४) **<u>श्री. करम सुधीर धसाडे,सदस्य,ग्रामपंचायत धाकणे, तहसिल शहापूर</u>**- हा एवढा मोठा प्रकल्प डोंगराच्या उंचावर असल्यामुळे आम्ही खालच्या भागात राहणाऱ्या लोकांना इजा पोहोचेल अशा प्रकारचे अतितीव्रतेचे स्फोट करु नयेत. तसेच वन जमीन शासनाची असली तरी कुळ म्हणून आदिवासींची नावे असणाऱ्या कुळांच्या नावाचाही विचार करुन त्यांना मोबदला देण्यात यावा.तसेच हा ग्रामीण भाग असून स्थानिक बेरोजगारांना रोजगार देण्यात यावा व कंपनीमार्फत ग्रामस्थांकरीता शाळा, कॉलेज, दवाखाना उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ज्या ग्रामस्थांच्या जमिनी वन हक्क अंतर्गत आहेत अशा लोकांची जिल्हाधिकाऱ्यांकडून कंपनीकडे यादी आलेली असून वनहक्काबाबत ज्यांच्याकडे कागदपत्रे आहेत त्यांनी कंपनीकडे जमा करावे अशी विनंती केली, जेणेकरुन जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेली यादी आणि लोकांची कागदपत्रे तपासणी करणे सुलभ होईल. तसेच वन हक्क जमिनीबाबत तालुका, उप विभाग व जिल्हा पातळीवर समिती नेमण्यात आलेली असून सदर समितीला निर्णय घेण्याचा अधिकार असतो आणि समितीचा जो निर्णय असेल तो निर्णय कंपनी मान्य करेल असे सांगितले.

५) **श्री.जीभा नामा वीर, रा. कोथळे, ता. शहापूर, जि. ठाणे**- सी.एस.आर. अंतर्गत काही प्रशिक्षण लावलेले होते, परंतु आमच्या इ. १२ वी उत्तीर्ण झालेल्या मुलांकरीता या अगोदर प्रशिक्षण दिले असते तर त्यांना रोजगार मिळाला असता. तसेच गावातील बहुतेक महिला अशिक्षित असल्याने त्यांना कंपनीत रोजगार मिळू शकत नाही, अशा महिलांचा विचार व्हावा. तसेच तीन वर्षात मुलांसाठी खेळणी, कपडे वाटप करण्यात यावा अशी विनंती आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शिक्षणासाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या ज्या कोर्सेस गावातील ज्या ज्या मुलांना देता येईल अशांना कोर्सेसचे प्रशिक्षण कंपनीमार्फत देण्यात येईल.

६) **<u>श्री. रुपेश ज. खडके, उप सरपंच, ग्रामपंचायत, कळभोंडे, ता. शहापूर, जि. ठाणे</u>**- प्रकल्पामार्फत जे वृक्षांची लागवड करण्यात येतील सदरच्या झाडांपासून ग्रामस्थांना उत्पन्न मिळेल अशा झाडांची लागवड करण्यात यावी हि विनंती. तसेच ग्रामस्थांना आरोग्य, पाणी, शिक्षण यासारख्या प्राथमिक सुविधा देण्यात याव्यात.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी प्रकल्प नाही तेथेही कंपनीमार्फत वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे, आणि वन अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामस्थांच्या सहकार्याने वृक्षारोपण होणार आहे.

७) **<u>श्री. दाऊ वीर, सदस्य, कोथळा ग्रामपंचायत, ता.शहापूर, जि. ठाणे</u>**- सध्या मी कळभोंडे-कोथळा हद्दीत काम करत असून, कंपनीने प्राधान्याने येथील आदिवासी ग्रामस्थांना जमतील अशी कामे देऊन नंतरच इतर लोकांचा रोजगारासाठी विचार व्हावा, तसेच कामगार मुंबईतून, दिल्लीवरुन आणू नयेत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी म्हटले की, रोजगारासाठी बाहेरुन लोकं आणल्यास त्यांच्या निवासाची अडचण होणार असल्याचे लक्षात घेता, शक्यतो स्थानिकांनाच रोजगार देण्याचा विचार होईल असे म्हटले. प्रकल्पाच्या सुरुवातीला अर्धकुशल कामगारांची गरज असून त्याकरीता स्थानिकांना रोजगार दिला जाईल.

८) **श्री.केसराम हीमा वीर, पोलीस पाटील, कोथळा, ता. शहापूर, जि. ठाणे**- म.प्र.नि. मंडळामार्फत ही सभा आयोजित केली असून या प्रकल्पासाठी संपादित होणारी जास्तीत जास्त जमीन वन पट्टा धारकांची आहे, त्याबाबत येथे उल्लेख आलेला नाही. त्या विषयाबाबत नंतर सभा होणार आहे अथवा या सभेमध्ये सदर विषय घेतला जाईल याची माहिती मिळावी ही विनंती.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक यांनी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने मुख्यत्वेकरुन पर्यावरणविषयक मुद्दे मांडण्यात यावेत अशी पुन्हा एकदा सर्वांना विनंती केली. तसेच याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर द्यावे असेही सांगितले.

९) **सौ. रिना जयराम खडके, ग्रामपंचायत सदस्या, कळभोंडे, ता. शहापूर, जि. ठाणे**- या प्रकल्पामध्ये केमिकलचा वापर होणार असेल तर केमिकलची विल्हेवाट नदीद्वारे करणार आहात किंवा दूसरा पर्याय वापरणार आहात. तसेच चिध्यांची वाडी ते कळभोंडे रस्त्याची दुरावस्था झाल्यानंतर लगेचच कंपनीमार्फत दुरुस्तीची कामे करुन घ्यावे, स्थानिक ग्रामस्थांना रोगजार उपलब्ध करुन द्यावे, दवाखान्याची सोय उपलब्ध करुन देण्यात यावे ही विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, या प्रकल्पामध्ये केमिकलचा वापर करण्यात येणार नाही.

१०) **श्री.मच्छिंद्र हरी वीर, माजी उप सरपंच, कोथळा ग्रामपंचायत, ता.शहापूर,जि. ठाणे**- प्रकल्पाचा मुख्य रस्ता कुठून येतो याची माहिती द्यावी आणि प्रकल्प जेंव्हा सुरु होईल तेंव्हा दोन्ही गावांना मोफत वीज पुरवठा देण्यात यावा.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक यांनी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने मुख्यत्वेकरुन पर्यावरणविषयक मुद्दे मांडण्यात यावेत असे सांगितले.

११) **श्री.भालचंद्र जयतु खडके, पोलीस पाटील, कळभोंडे गाव, ता. शहापूर, जि. ठाणे**- कंपनीकडून टनेलचे आकार गोल असल्याचे सांगितले असून टनेलची पाणी गळतीसाठी केमिकलचा वापर करण्यात येतो. खालचा जलाशय हाकेच्या अंतरावर असून लोक नदीलगत पावसाच्या पाण्यावर हंगामी शेती करतात. त्यामुळे टनेलसाठी वापरलेले केमिकल पावसाळयात नदीलगत वाहत गेल्याने आदिवासी बांधवांच्या अन्नाचे प्रमुख स्त्रोत मासे उत्पादनावर परिणाम होईल. तसेच हा प्रकल्प साधारणत: २७८ हेक्टर जमीनीमध्ये होणार असून या भागात येणारे ३००० कामगारांमार्फत जमा होणाऱ्या प्लॅस्टीकची विल्हेवाट कशी करणार आहात यांची माहिती द्यावी.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या प्रकल्पामध्ये कोणतेही केमिकलचा वापर केला जाणार नाही. तसेच प्रकल्पात एकदम ३००० हजार कामगार येणार नसून ते टप्प्याटप्प्याने येणार आहेत. तरीही कामगारांकडून जमा होणाऱ्या प्लॅस्टीकची विल्हेवाट करण्यासाठी कंपनीकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१२) **श्री. काशिनाथ सोमा वीर, कोथळे, ता. शहापूर, जि. ठाणे**-आमचे पालकवर्ग अशिक्षित असून महसुल विभागाकडून जमीन संपादनाअगोदर कोथळा कळभोंडा गावातील ७/१२ उताऱ्यावर वारसांची प्रकल्पाच्या माध्यमातून नोंद करुन घ्यावेत.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक यांनी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने मुख्यत्वेकरुन पर्यावरणविषयक मुद्दयांचा विचार होईल असे म्हटले.

कृ.मा.प.

१३) **<u>श्री. कृष्णा सोंगाळ, मुक्काम धसवाडी, ता. शहापूर, जि. ठाणे-</u>** इथल्या कामगारांना समृध्दी महामार्गाप्रमाणे रोजगार मिळावा ही विनंती.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक यांनी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने मुख्यत्वेकरुन पर्यावरणविषयक मुद्दयांचा विचार होईल असे म्हटले.

१४) **<u>श्री. शिवराम बुधा वीर, कोथळे, ता. शहापूर, जि. ठाणे-</u>** प्रकल्पाचा जिथे टनेल होतो तेथे माझ्या गेल्या तीन पिढ्यांपासून जमीन कसत आहे, परंतु दोन वेळा गाव जळाल्यामुळे माझ्याकडे पुरावा नाही, याबाबत काही तरी कार्यवाही करावी ही विनंती.

मा. अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांनी या विषयाबाबत मा.तहसिलदार यांच्यामार्फत चौकशी करण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक यांनी ग्रामस्थांनी विचारलेल्या प्रश्नांची नोंद घेतली असल्याचे सांगितले.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, हा प्रकल्प जरी मे.जे.एस.डब्ल्यु.एनर्जी पी.एस.पी.टू.लि.,चा असला व शासनाच्या सहकार्याने होत असला तरीही आपणां सर्व ग्रामस्थांच्या सहकार्यानेच यशस्वी होईल आणि या परिसरामध्ये चांगला विकास होईल. तसेच ग्रामस्थांनी जे जे प्रश्न/सूचना मांडलेले आहेत ते चांगले प्रश्न/सूचना आहेत. कंपनीकडून ७ कोटी रुपयांचा निधी सी.एस.आर. अंतर्गत खर्च करण्यात येणार असून विशेषत: पाणलोट क्षेत्राचा विकास करण्यात येणार आहे. मेडिकल कँपकरीता अगोदरच तरतूद केलेली आहे.

१५) **<u>श्री. भालचंद्र जयतु खडके, पोलीस पाटील, कळभोंडे गाव, ता. शहापूर, जि. ठाणे-</u>** या प्रकल्पाकरीता एकूण ३००० कामगार दाखविले असून इतक्या कामगारांना मुलभूत सुविधा पुरविण्याची कळभोंडे ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे सदर कामगारांचे स्वच्छतेचे, सांडपाण्याची व्यवस्था कशी करण्यात येईल?

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पात एकदम ३००० हजार कामगार येणार नसून ते टप्प्याटप्प्याने येणार आहेत. तरीही कामगारांकडून जमा होणाऱ्या प्लॅस्टीकची विल्हेवाट करण्यासाठी कंपनीकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक यांनी कंपनीमार्फत सांडपाण्याची काय व्यवस्था करण्यात येईल असा श्री. खडके यांचा प्रश्न आहे असे म्हटले.

तदनंतर प्रकल्प प्रवर्तक यांनी कंपनीमार्फत लेबर कँपमध्ये सांडपाणी प्रक्रिया सयंत्र बसविण्यात येईल असे सांगितले. श्री. लहु जाधव, कंपनीचे अधिकारी यांनी सांगितले की, सदरची कंपनी नामांकित कंपनी असून पर्यावरणविषयक मानके (Standard) सांभाळणार असल्याने पर्यावरण संवर्धनाबाबत कोणीही काळजी करु नये अशी विनंती केली.

कृ.मा.प.

१६) **<u>श्री.शिवाजी वीर, सदस्य, ग्रामपंचायत कळभोंडे, ता. शहापूर, जि. ठाणे-</u>** या परिसरात साधारण १३ किलोमीटरवर शाळा असून कंपनीमार्फत गावात इ.१ली ते इ. १० वी पर्यंतची शाळा सुरु करण्यात यावी. तसेच कुशल व अकुशल कामगारांना रोजगार मिळावा हि विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सदरबाबत कंपनीकडून नक्की विचार केला जाईल असे सांगितले.

१७) **<u>सौ.जया सोमनाथ वाघ, सरपंच, ग्रामपंचायत कळभोंडे, ता. शहापूर, जि. ठाणे-</u>** गावातील महिलांना जास्त प्राधान्य दिले पाहिजे, महिलांच्या समस्या कंपनी व्यवस्थापनाकडून जाणून घेतल्या पाहिजेत. तसेच ज्या लोकांच्या जमिनी जातील त्यांना पर्यायी जमिन उपलब्ध करुन दिली पाहिजे, प्रकल्पबाधितांच्या कुटुंबातील लोकांना कायमस्वरुपी काम दिले पाहिजे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सर्व गावांमधील महिलांसाठी कंपनीमार्फत खूप चांगल्या योजना आखल्या असून सदर योजनांमध्ये सर्व महिलांनी कृपया भाग घ्यावा अशी विनंती केली.

१८) **<u>श्री. अशोक इरनक, शहापूर, जि. ठाणे-</u>** यापूर्वी मे. ॲफकॉन कंपनीने लिहून दिलं होतं की, कंपनीचे काम झाल्यावर पूर्ण रस्ता दुरुस्त करुन देऊ असे सांगितले होते, परंतु कंपनीचे काम झाल्यावर त्या रस्त्यावरुन चालणेही शक्य होत नव्हते, त्यामुळे येथे जो काही विषय होणार आहे ते स्थानिक ग्रामपंचायतीबरोबर लिखित स्वरुपात व्हावयाला पाहिजे असे सांगितले.

मा.अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आपण आपला मुद्दा मांडू शकता पण ही पर्यावरण विषयक जनसुनावणी असल्याने मुख्यत्वेकरुन पर्यावरणविषयक बाबी मांडाव्यात असे सांगितले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी आदरपूर्वक सांगितले की, हा प्रकल्प येथेच राहणार असून पूर्ण झाल्यानंतर कोठेही जाणार नाही. तसेच कंपनीच्या अवजड वाहनांमुळे दुरावस्था झालेल्या रस्त्याची लगेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कंपनीच्या सहकार्याने दुरुस्ती करण्यात येईल असे सांगितले.

१९) **<u>श्री. हिमा चंदर खडके, रा. कळभोंडे, ता. शहापूर, जि. ठाणे-</u>** कळभोंडे, ता. शहापूर येथील कोथळे ते कळभोंडे यादरम्यानच्या वन जमिनीचे धारे भरणाऱ्यांबाबत काही निर्णय होणार आहे का? ते सांगावे हि विनंती. तसेच त्यांच्यामार्फत श्री.खडके पोलीस पाटील यांनी सांगितले की, कळभोंडा ते पाटोळ या ठिकाणी सन २००४ पर्यंत वन जमिनीसाठी धारे भरत होते. सन २००४ नंतर या जमिनीच्या ७/१२ वर श्री. अब्दुल सत्तार यांनी महाराष्ट्र शासन अधिनियम अंतर्गत जमिनीचे हस्तांतरण करण्यात आले व त्या बाबत ग्रामस्थांना कोणतीही स्पष्टता आलेली नाही. तसेच धारे बंद झाले तेंव्हा गावात सर्वे करुन तलाठी सजा यांचेकडे चौकशी केली असता, यापुढे कळभोंडे हद्दीतील फेरफार यापुढे स्विकारण्यात येऊ नये असे आदेश असल्याचे समजले असून हि जागा भूसंपादनात जाणार असेल तर त्याबाबत विचार व्हावा अशी विनंती केली. तसेच पाटोळ आणि कळभोंडे येथील काही जमिन छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात बक्षीस म्हणून दिली होती व एका मुस्लिम व्यक्तीच्या नावे करण्यात आली होती, तदनंतर ते नाव कमी होऊन ७/१२ वर महाराष्ट्र शासन असे नाव लागलं. सदर जमिनीवर कुळ म्हणून इतर हक्क म्हणून नाव लागलेले आहे. कुळाऐवजी ७/१२ वर वर्ग-१ वारसदार म्हणून सबंधितांची नावे लावण्यात यावे ही विनंती.

मा.अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांनी या संदर्भात मा.तहसिलदारा यांच्यामार्फत चौकशी करण्यात येईल असे सांगितले.

कृ.मा.प.

मा.अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांनी या जनसुनावणीस उपस्थित सर्व अधिकारी, पदाधिकारी, प्रतिनिधी व सर्वसामान्य जनतेचे स्वागत केले आणि खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.

१. सदरची सुनावणी व सादरीकरण खुप तांत्रिक भाषेत झालेली असून प्रशासकीय अधिकारी या नात्याने प्रकल्पाबाबत तांत्रिक बाबी आमच्याही लवकर लक्षात येत नसल्याने, सर्वसामान्य जनतेला मुख्यत्वेकरुन काय होणार आहे, त्यांना प्रकल्पधारकांकडून काय सुविधा देण्यात येतील याबाबत समजेल अशा भाषेत सादरीकरण देता आलं असतं तर बर झालं असतं.
२. कंपनीच्या लोकांनी परिसरात फिरुन कंपनीकडून काय करण्यात येणार आहे याबाबत लोकांना माहिती देऊन त्यांचं सहकार्य मिळविले आहे, परंतु कपंनीचे प्रतिनिधी गावचे सरपंच, सदस्य, पोलीस पाटील या मर्यादेपर्यंत भेटले असल्याचे निदर्शनास येते, परंतु शेवटच्या व्यक्तीपर्यंत जाऊन समजावून सांगण्याची गरज असते.
३. सर्वसामान्य कामगार लोकांनीही स्वत: येऊन आपले मत व्यक्त केले याचं कौतुक करुन कंपनीकडून पर्यावरणावर परिणाम होणार नाही याबाबत आवश्यक ती कार्यवाही केली पाहिजे. दूसरी गोष्ट अशी की, या प्रकल्पाचा टनेल विशेषत: भूमिगत आहे, ब्लास्टिंग व पुढील प्रक्रियेमुळे परिसरात भौगोलिक परिणाम जसे की, जैविक व अजैविक संस्थामध्ये बिघाड निर्माण होऊ शकतो त्याच्याशी इथल्या लोकांच्या उपजिविकेशी/उत्पन्नाशी संबंध येणार असेल तर इथल्या लोकांचे रोजगार/उपजिविकेसंदर्भात देखील विचार प्रकल्पधारकांकडून करणे आवश्यक आहे.
४. कोणतेही प्रकल्प आल्यानंतर स्थानिक लोकांमध्ये त्यांच्या रोजगाराची संधी हिसकावून घेतली जाते की काय अशी भिती निर्माण होते, तशी न होता प्रकल्पधारकांकडून पुढाकार घेऊन त्यांना रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि मुलभूत सुविधा पुरवाव्यात. तसेच वृक्षारोपण करतांना, स्थानिकांनी केलेल्या सूचनेप्रमाणे स्थानिकांचा उत्पन्न वाढण्यास मदत होईल अशा झाडांची लागवड करणे व इतर छोट्या छोट्या गोष्टींचादेखील प्रकल्प धारकांकडून विचार व्हावा.
५. केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे प्रस्ताव सादर करतांना ते पारदर्शकपणे सादर करण्यात यावेत.

**निष्कर्ष** : जनसुनावणीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, ग्रामस्थ, व्यवसायिक सहभागी झाले होते आणि त्यांनी प्रकल्पाच्या संदर्भात अपेक्षा व आक्षेप व्यक्त केले. संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण- ३ यांनी सांगितले की, मा.अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे व जनसुनावणी समितीचे सदस्य, प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून लोकप्रतिनिधी व गावकरी यांचा पर्यावरणविषयक बाबींचा विरोध, सूचना, अपेक्षा इत्यादींबाबतची नोंद घेतली आहे. शेवटी संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या मान्यतेने जनसुनावणीची प्रक्रिया संपन्न झाल्याचे जाहीर केले.

( डॉ.सीमा उदय दळवी )
समितीचे संयोजक आणि
उप-प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३

( डॉ. राजेंद्र आ. राजपूत )
समितीचे सदस्य आणि
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण

( मनिषा जायभाये-धुळे )
समितीचे अध्यक्ष आणि
अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा